# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 15 February 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

नवीन आयकर विधेयकाच्या पडताळणीसाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी ३१ सदस्यांची समिती गठीत केली आहे. भारतीय जनता पक्षाचे बैजयंत पांडा या समितीचे अध्यक्ष असतील. संसदेच्या पुढील सत्राच्या पहिल्या दिवशी ही समिती आपला अहवाल सादर करेल. आयकर विधेयक २०१५ गेल्या गुरुवारी लोकसभेत सादर झालं. आयकराशी संबंधित कायद्याला आणखी सक्षम करणं आणि त्यात सुधारणा आणणं हा या विधेयकाचा उद्देश आहे.

****

सरकारी स्वामित्व असलेल्या भारत संचार निगम लिमिटेड – बीएसएनएल ने २०२४–२५ या आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत दोनशे ६२ कोटी रुपयांचा नफा मिळवला आहे. सार्वजनिक क्षेत्राच्या उपक्रमांना सक्षम बनवण्याकरिता टेलिफोन सेवा उपलब्ध करून देण्याच्या दिशेनं सरकारची ही मोठी उपलब्धी असल्याची माहिती केंद्रीय संचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहरांना दिली. गेल्या १७ वर्षात प्रथमच बीएसएनएलनं एका तिमाहीत मिळवलेला हा सर्वाधिक नफा असल्याचं ते म्हणाले.

****

शनिशिंगणापूर इथल्या शनिदेवाला यापुढे केवळ ब्रँडेड तेलानेच अभिषेक घालता येणार आहे. भेसळीच्या तेलामुळे मूर्तीची झीज होत असल्याने देवस्थानने हा निर्णय घेतला आहे. येत्या १ मार्चपासून हा निर्णय लागू होणार आहे.

****

बँकांसाठी असलेल्या तरतुदींचं उल्लंघन केल्यामुळे भारतीय रिजर्व बैंक–आर.बी.आय ने श्रीराम फाइनांस लिमिटेड ला ५ लाख ८० हजार रुपये, उज्जीवन स्मॉल फाइनांस बँक लिमिटेड ला ६ लाख ७० हजार रुपये तर नैनीताल बँक

लिमिटेड ला ६१ लाख ४० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. वैधानिक नियम आणि विनियामकांच्या अंमलबजावणीतल्या त्रुटींमुळे या खाजगी वित्तीय संस्थांवर ही दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

****

संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता, मंगल प्रभात लोढा यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी मंत्रालयात आयोजित कार्यक्रमास सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव सचिन कावळे, यांच्यासह राजेंद्र बच्छाव, मेघा गवळी तसंच मंत्रालयीन विविध विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गुलाबपुष्प अर्पण करून संत सेवालाल महाराजांना अभिवादन केलं.

****

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील स्वागत कक्षामध्ये आज संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी. डी. पवार यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विद्यापीठाचे विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, रामदास खोकले, गणेश पवार, बबन हिंगे यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांनी संत सेवालाल महाराज यांना अभिवादन केले.

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या ४४ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाला आजपासून प्रारंभ झाला. या संमेलनासाठी छत्रपती संभाजीनगरनजिक वाळूज इथल्या दगडोजीराव देशमुख महाविद्यालयात विलासराव देशमुख साहित्यनगरी साकारण्यात आली आहे. डॉ. भीमराव वाघचौरे या मराठवाडा साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष तर विजय राऊत स्वागताध्यक्ष आहेत. या दोन दिवसीय संमेलनात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत एकूण ५९४ पाणी पुरवठा योजनांचा कृती आराखडा मंजूर करण्यात आला असून त्याअंतर्गत गावांतील नागरिकांना प्रती व्यक्ती दररोज ५५ लिटर पाणीपुरवठा करण्याचं उद्दिष्ट आहे. संबंधित योजनांना आवश्यक मुदतवाढ दिली असून कामांना गती देण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. ठेकेदारांकडून वेळेत काम पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा केला जात असून,

उशीर करणाऱ्या ठेकेदारांवर नियमानुसार कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचं जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे कार्यकारी अभियंता मोहन सरवदे यांनी सांगितलं आहे.

****

नागपूर इथल्या महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाचा तिसरा दीक्षांत समारंभ होत असून या कार्यक्रमाला सरन्यायाधीश माननीय न्यायमूर्ती संजीव खन्ना प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित आहेत. या कार्यक्रमात भारताचे माजी मुख्य न्यायाधीश आणि विद्यापीठाचे संस्थापक कुलपती न्यायमूर्ती शरद ए. बोबडे, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि विद्यापीठाचे प्र-कुलपती माननीय न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायपालिका आणि शैक्षणिक क्षेत्रातील सदस्यांची उपस्थिती आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केलं. या दीक्षांत समारंभात, एकूण १५५ पदवीधरांना पदव्या प्रदान केल्या जातील, याव्यतिरिक्त, गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीबद्दल २२ सुवर्णपदकं प्रदान केली जातील.

****